


दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com
RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे | अंक : २७१ वा | शुक्रवार दि ०९ जानेवारी २०२६ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# आधी भाजपसोबत युती आणि नंतर थेट पक्षप्रवे

# कमळ हाती घेणाऱ्या १२ नगरसेवकांना काँग्रेस मोठा दणका देणार?

**वृत्तसंस्था/ अंबरनाथ**

अंबरनाथ नगरपालिका निवडणुकीत भारतीय जनता पक्षाशी हातमिळविणी केल्याप्रकरणी महाराष्ट्र काँग्रेसने या अगोदरच पक्षाच्या १२ नगरसेवकांना निलंबित केले आहे. आता या नगरसेवकांचे सदस्यत्व रद्द करण्यासाठी पक्षाकडून थेट कायदेशीर मार्गाचा अवलंब केला जाणार आहेफ, अशी माहिती पक्षाचे प्रवक्ते सचिन सावंत यांनी गुरुवारी दिली. या १२ नगरसेवकांनी बुधवारी भाजपमध्ये प्रवेश केला असून हा प्रकार बेकायदा असल्याचेही ते म्हणाले. अंबरनाथ येथे नुकत्याच झालेल्या नगरपालिका निवडणुकीत काँग्रेसच्या स्थानिक नेतृत्वाने अंबरनाथ विकास आघाडी स्थापन केली. पक्षाच्या नवनिर्वाचित १२ नगरसेवकांनी भारतीय जनता पक्षाला पाठिंबा दर्शविला होता. याविरोधात काँग्रेसकडून शिस्तभंगाची कारवाई करीत प्रवीण पाटील यांच्यासह १२ जणांचे निलंबन करण्याचा निर्णय घेतला होता. त्याचवेळी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी अंबरनाथ ब्लॉक समितीही बरखास्त केली होती. पक्षाने केलेल्या या कारवाईनंतर प्रवीण पाटील हे १२ नगरसेवकांसह भारतीय जनता पक्षात दाखल झाले. पाटील यांच्या पक्षप्रवेशानंतर राजकीय वर्तुळात नव्या चर्चेस सुरुवात झाली आहे. त्यानंतर याबाबत सचिन सावंत यांनी माहिती दिली.



अंबरनाथ नगरपालिका निवडणुकीत काँग्रेस पक्षाच्या चिन्हावर निवडून आलेल्या १२ नगरसेवकांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. हा प्रकार पूर्णपणे बेकायदा असून या सर्व १२ नगरसेवकांचे सदस्यत्व रद्द करण्यासाठी काँग्रेस पक्ष कायदेशीर कारवाई करणार आहे. स्वतंत्र गट स्थापन करणे किंवा नंतर दुसऱ्या पक्षात प्रवेश करणे हे अनैतिक तर आहेच, परंतु घटनाविरोधीही आहे. लवकरच या सर्वांना कायदेशीर नोटीसा बजावण्यात येतील अशी माहिती सावंत यांनी दिली.

# जिल्हा परिषद-पंचायत समिती निवडणुकांना एप्रिलचा मुहूर्त?

**जनसंचलन/ नागपूर**

नगर पंचायत व नगर परिषदांच्या निवडणुका पार पडल्यानंतर आता लवकरच महानगरपालिकांच्या निवडणुका होत आहेत. जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकांचा मुहूर्त मात्र लागलेला नाही. या निवडणुका याच महिन्यात होतील, असा सुरुवातीचा अंदाज जवळपास चुकीचा ठरला आहे. राज्यातील ज्या जि. प. मधील आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांहून अधिक गेलेली नाही, तेथील निवडणुका फेब्रुवारी तर इतर ठिकाणच्या निवडणुका एप्रिल महिन्यात होतील, अशी चर्चा प्रशासकीय वर्तुळात आहे. यात नागपूर जि. प. मधील आरक्षणाची मर्यादा ओलांडण्यात आल्याने येथे इतक्यातच निवडणुका होण्याची शक्यता नाही, अशी चर्चा आहे. सर्वोच्च न्यायालयाने सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ जानेवारी २०२६ पूर्वी घेण्याचे आदेश दिले आहेत. त्या पार्श्वभूमीवर नगर पंचायती व नगर परिषदांच्या निवडणुका पूर्ण झाल्या, तर महानगरपालिकांच्या निवडणुकाची प्रक्रिया वेळेत संपणार आहे. या सर्व निवडणुकांसाठी साधारण महिनाभराचा कालावधी दिला जात असल्याने ३१ जानेवारीपूर्वी जिल्हा परिषदांच्या निवडणुका होणे शक्य नसल्याचे प्रशासकीय पातळीवर स्पष्ट होत आहे. याशिवाय फेब्रुवारी व मार्च महिन्यात दहावी आणि बारावीच्या परीक्षा असतात. या कालावधीत निवडणुका घेतल्या जात नाहीत. त्यामुळे जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुका एप्रिल किंवा मे महिन्यात होतील, अशी चर्चा सध्या प्रशासकीय वर्तुळात सुरू आहे. दरम्यान, ज्या जि. प. मधील आरक्षण ५० टक्क्यांपेक्षा कमी आहे तेथे निवडणुकांची शक्यता वर्तविली जाते आहे. १० ते १५ जानेवारी दरम्यान या निवडणुकांची घोषणा होईल व फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यापूर्वी या निवडणुका घेतल्या जातील, असा अंदाज आहे. मात्र, ज्या जि. प. मधील आरक्षण ५० टक्क्यांहून अधिक झाले आहे तेथील निवडणुका आत्ताच लागणार नाहीत, असे संकेत प्रशासकीय वर्तुळातून मिळत आहेत. आरक्षणाची टक्केवारी ५० टक्क्यांवर गेल्याच्या मुद्द्यावर २१ जानेवारी रोजी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. या सुनावणीनंतरच या जि. प. मधील निवडणुकांबाबत



निवडणूक आयोगाची पुढील भूमिका स्पष्ट होईल, अशी चर्चा प्रशासकीय पातळीवर सुरू आहे. त्यातच फेब्रुवारीच्या तिसऱ्या आठवड्यानंतर बारावी व त्यानंतर दहावीच्या परीक्षांची धावपळ सुरू होणार आहे. त्यामुळे मार्च अखेरीपर्यंत जि. प. निवडणुका लागणे शक्य नसल्याने एप्रिल महिन्यातच या निवडणुका होतील, असा अंदाज व्यक्त केला जातो आहे.

# महिला शिक्षणासाठी फातिमाबी शेख व उस्मान शेख यांनी केलेल्या अभूतपूर्व कार्यचा समाजाला विसर.

फातिमाबी शेख ह्या शिक्षणाची क्रांती ज्योती महात्मा ज्योतिबा फुले व प्रथम महीला शिक्षिका सावित्रीबाई फुले यांच्या महीला, अस्पृश्यांसाठी शिक्षणाच्या लढ्यात ज्यांनी मोलाचे योगदान दिले अश्या भारतातील पहिल्या सहशिक्षिका फातिमा शेख यांनी भारतातील शिक्षणप्रसारात मोलाची कामगिरी बजावली. आज शिक्षणाचे माहेरघर म्हणून जगप्रसिद्ध पुणे शहरात त्याकाळी वर्ण,भेद अस्पृश्यता , धर्म बुडण्याच्या भाकड समजुतीवर आणि परंपरेच्या नावाखाली दलित, आदिवासी बहुजन व स्त्रियांना शिक्षणाचा हक्क नाकारला होता. त्यामुळे या मुलींना शिक्षणाचा हक्क मिळावा, ही फातिमा शेख यांची ठाम भूमिका होती. त्यांनी सावित्रीबाई आणि ज्योतिराव फुले यांच्यासह महीला शिक्षणासाठी लढा दिला. हे काम म्हणजे महात्मा ज्योतिराव फुले यांनी चालू केलेल्या सत्यशोधक चळवळीचाच एक भाग होता. सर्वसाधारण कुटुंबात जन्मलेल्या फातिमाबी शेख या उस्मान शेख यांच्या भगिनी होत्या. मुळातच महीला शिक्षणाला कडाडून विरोध महीला शिक्षणासाठी महिलाच शिक्षक असल्यास शिक्षणाकडे महिलावर्ग आकर्षित होईल या उद्देशाने महात्मा ज्योतिबा फुले यांनी आपल्या पत्नी सावित्रीमाई फुले यांना प्रथमतः घरीच शिक्षण दिले, महात्मा फुले यांच्या मदतीने सावित्रीबाई फूले यांनी १ जानेवारी १८४८ साली स्त्रियांसाठी बुधवार पेठेतील भिडे वाड्यात पहिली शाळा सुरू केली. मात्र, हे कृत्य धर्मविरोधी असल्याचा आरोप करण्यात आला. त्यातूनच त्यांच्या कुटुंबियांनी आणि गावातील इतर लोकांनीही या दाम्पत्यावर बहिष्कार टाकला. त्यांना घराबाहेरही काढले. अशावेळी फातिमा शेख आणी त्यांचे बंधू उस्मान शेख यांनी फुले दाम्पत्यांना राहण्यासाठी आणि शाळा चालविण्यासाठी राहते घर दिले. या दाम्पत्याच्या कल्पनेने प्रेरीत होऊन उस्मान शेख यांनीही फातिमाबी शेख यांना शिकण्यासाठी प्रोत्साहन दिले. त्याचबरोबर शिक्षणापासून वंचित असलेल्या समाजात शिक्षणाचा प्रसार करण्याची प्रेरणाही दिली. त्यानंतर सावित्रीबाईंच्या बरोबरीने फातिमाबी शेख यांनीही शिक्षिका होण्यासाठी खूप कष्ट सोसले. त्याकाळी पेशवाईचा दबदबा असल्याने महात्मा ज्योतिबा फुले सावित्रीबाई फुले व शेख भावंडांना देखील महीला शिक्षणं विरोधी लोकांचा रोष, छळ सहन करावा लागला. फातिमा शेख मुलींना शिकविण्याचे काम करीत असत. घरोघरी जाऊन मुलींच्या शिक्षणाचे महत्व पटवून देत मुलींना शाळेत पाठवायला सांगत. शाळेचे कामकाजही त्याच बघत असत. त्यामुळेच फुले यांचे कार्य पूर्णत्वास नेण्यात फातिमाबी शेख यांचे मोलाचे योगदान आहे. शिक्षणाचे कार्य अखंड चालू राहण्यासाठी त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. सावित्रीबाईंचा त्या मोठ्या आधार होत्या आणि सत्यशोधक चळवळीचे कारणही! सावित्रीबाई फुले यांनी ज्योतिराव फुले यांना लिहिलेल्या पत्रांमध्ये फातिमा यांच्याविषयी आदरयुक्त प्रेमाच्या आणि प्रशंसेच्या भावना व्यक्त केल्या आहेत. सावित्रीबाईंची ही पत्रे फातिमा शेख यांच्या योगदानाविषयी माहिती देणारा महत्त्वाचा स्त्रोत आहेत. दीर्घकाळच्या प्रयत्नांनंतर आता कुठे सावित्रीबाईंच्या कार्याची जाणीव समाजाला झाली आहे. मात्र, फातिमा शेख अजूनही विस्मृतीच्या पडद्याआडच आहेत. भारताच्या इतिहासात अशा अनेक महान स्त्रिया आहेत, ज्यांच्या महत्त्वपूर्ण योगदानाची साधी दखलही कुणी घेतली नाही. फातिमा शेख हे त्यापैकीच एक नाव. अल्पसंख्यांक जाती आणि अनुसूचित जाती-जमाती अशा सर्व प्रकारच्या लोकांसाठी त्यांनी लढा दिला. दलित आणि मुस्लिम मुले व महिलांना साक्षर करणे हे त्यांचे ध्येय होते. त्यामुळे त्यांना हिंदू धर्मातील लोकांबरोबरच मुस्लिमांच्या विरोधालाही तोंड द्यावे लागले. वास्तविक, इस्लाम धर्म स्त्री शिक्षणाच्या विरोधात नाही. मुस्लिम स्त्रियांना शिक्षण घेण्यास हिंदू स्त्रियांप्रमाणे धर्म बुडविला वगैरे अशी भाकड समजूत नव्हतीच. महिला शिक्षणाच्या माध्यमातून समाजसुधारणेचा लढाही त्या लढल्या. फुले दाम्पत्यांना समाजातून इतका प्रखर विरोध असतांनाही त्यांना आश्रय दिला तो केवळ दलित, आदिवासी स्त्रिया व मुलांच्या हक्कांसाठी त्यांच्या शिक्षणाच्या वाटा मोकळ्या व्हाव्यात म्हणुन. पहिल्या काही भारतीय मुस्लिम स्त्री शिक्षिकांमध्ये त्यांची गणना होते. प्रत्येक महान कार्याच्या व प्रगतीच्या मागे अप्रत्यक्ष भूमिका बजावणाऱ्यांचे पण मोलाचे योगदान असते. शिक्षणाच्या या लढ्यात प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष अभूतपूर्व योगदान असलेली फातीमाबी शेख व उस्मान शेख या सुशिक्षित भावंडांचे अद्वितीय कार्याची इतिहासकारांनी विशेष दखल घेतली नाही. ज्या फुले दाम्पत्यांना महीला व दलितांच्या शिक्षणासाठी उच्च वर्गातून तीव्र विरोध झाला ज्यांना शेण दगडांचा मार सहन करावा लागला, ज्यांची भिडे वाड्यातील शाळा बंद पाडली स्वतःच्या कुटुंबाने घरातून हाकलून दीले त्यावेळी त्यांना आश्रय दिला तो शेख भावंडांनी. शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या महात्मा फुले व सावित्रीबाई फुले व त्यांच्या कुटुंबाला इतका त्रास झाला असेल तर ज्या शेख भावंडांनी त्यांना आश्रय दिला त्यांना पण उच्च वर्गाने प्रताडीत केले असेलच यात शंका नाही. इतिहासकार व लेखक हे आपल्या शब्दांच्या सुबक मांडणीतून महान कार्य करणाऱ्या लोकांना इतिहासात अजरामर करून जातात. महिला शिक्षणासाठी फुले दाम्पत्याच्या खांद्याला खांदा लावून लढलेल्या या महान शिक्षिकेला इतिहासात, पाठ्यपुस्तकात, शासकीय कार्यालयात विशेष जागा मिळालीच नाही दुर्दैव आजही महिला व दलितांच्या शिक्षणासाठी आयुष्य पणाला लावलेल्या फातिमाबी शेख यांचा समाजाला विसर पडला. महाराष्ट्र सरकारने शेख यांच्या योगदानाची २०१४ साली दखल घेतली. उर्दू शाळांमध्ये शिकविल्या जाणाऱ्या पाठ्यपुस्तकांत आता डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम, सर सईद अहमद खान आणि झाकीर हुसेन यांच्यासह फातिमा यांच्या कार्याच्या संक्षिप्त माहितीचा समावेश आहे

लेखक
मुख्तार शेख




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# महाराष्ट्रातील भ्रष्टचाराचे आका अजित पवार’, भाजप आमदार महेश लांडगे यांचा घणाघात..

**पिंपरी-चिंचवड :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हेच महाराष्ट्रातील भ्रष्टाचाराचे ‘आका’ असल्याचा आरोप भाजप आमदार महेश लांडगे यांनी केला आहे. पिंपरी-चिंचवडमधील भ्रष्टाचाराच्या आकाला संपवायचं आहे, असा थेट इशारा अजित पवारांनी दिल्यानंतर आज आमदार महेश लांडगे यांनी त्यांना प्रत्युत्तर दिलं. ७० हजार कोटींच्या कथित घोटाळ्याच्या आरोपावरून महेश लांडगे यांनी अजित पवारांना लक्ष्य केलं. ङ्क७० हजार कोटींचा घोटाळा करणारे अजित पवार हेच महाराष्ट्रातील भ्रष्टाचाराचे आका आहेत. आम्हीही पुराव्यानिशी आरोप करू, पण ते आरोप त्यांना सहन होणार






नाहीत, असं लांडगे म्हणाले.

उमेदवारी मागायला कुणी येत नसल्याने अजित पवार चिडचिड करत आहेत. चिठ्ठी वाचून स्क्रिप्टेड भाषण करणं ही त्यांची सवय झाली आहे. त्यांच्याकडे मोठे डायरेक्टर आणि चाणक्य असतील, पण बिनबुडाचे आरोप करू नयेत,ङ्घ असा इशाराही महेश लांडगे यांनी दिला. ‘१९९१ पासून अजित पवार पिंपरी-चिंचवडच्या राजकारणात सक्रिय असून ते कायम सत्तेत राहिले आहेत. ते राज्याचं नेतृत्वही करू शकले, मात्र त्यांनी नेमकं काय केलं? उंटावर बसून शेळ्या हाकण्याचंच काम केलं,ङ्घ असा घणाघात लांडगे यांनी केला. शरद पवारांमुळेच अजित पवार पिंपरी-चिंचवडमध्ये आले आणि त्यांची ओळख निर्माण झाली. मात्र आज तेच अजित पवार शरद पवारांना सोडून भाजपसोबत आले आहेत. भ्रष्टाचार लपवण्यासाठीच ते भाजपसोबत आले आहेत का?ङ्घ असा थेट सवालही लांडगे यांनी उपस्थित केला.माझ्या संपत्तीवर बोलण्याऐवजी अजित पवारांनी स्वतःची जुनी आणि सध्याची परिस्थिती पाहावी. ते गेली २५ वर्षे पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत, पाच वेळा उपमुख्यमंत्री राहिले आहेत,ङ्घ असं म्हणत त्यांनी अजित पवारांच्या संपत्तीकडेही बोट दाखवलंअजित पवारांनी नेहमीच स्थानिक भूमिपुत्रांना डावललं असून कुणालाही मोठं होऊ दिलं नाही, असा आरोप करत ङ्कसध्या राष्ट्रवादीची अवस्था अत्यंत बिकट आहे. त्यांना १२८ उमेदवारही मिळाले नाहीत. स्वतः चं झाकून ठेवायचं आणि दुसऱ्याचं वाकून पाहायचं हीच त्यांची वृत्ती आहे,ङ्घ अशी टीका महेश लांडगे यांनी केली.

## शिवसेनेच्या उमेदवारावर हल्ला





**मुंबई :** राज्यभरात महापालिका निवडणुकींचा धुराळा सुरु असताना काही अप्रिय घटना देखील घडताना दिसत आहेत. छत्रपती संभाजीनगर येथे माजी खासदार इम्तियाज जलील यांच्या गाडीवर हल्ल्याचा प्रयत्न झाल्याची घटना ताजी असतानाच आता मुंबईतून एक धक्कादायक घटना समोर येत आहे. मुंबईत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या उम ेदवारावर अज्ञात इसमाकडून जीवघेणा हल्ला झाल्याची माहिती मिळत आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. मुंबईच्या वांद्र्यात शिंदेंच्या शिवसेना उमेदवारावर हल्ला झाल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे.मुंबईतत वॉर्ड क्रमांक ९२ मधून महापालिका निवडणुकीच्या रिंगणात असणाऱ्या उमेदवारावर जीवघेणा हल्ला झाला आहे. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे वॉर्ड क्रमांक ९२ चे उमेदवार हाजी सालिन कुरेशी यांच्यावर जीवघेणा हल्ला झाल्याची माहिती आहे. एका अज्ञात इसमाने हाजी सालिन कुरेशी यांच्या पोटात चाकू भोसकल्याची माहिती आहे. संबंधित घटना ही वांद्र्यातील ज्ञानेश्वर नगरात घडली आहे. या घटनेनंतर शिवसैनिकांनी हाजी सालिन कुरेशी यांना तातडीने रुग्णालयात नेले. त्यांच्यावर महात्मा गांधी रुग्णालयात उपचार सुरु असल्याची माहिती आहे. हाजी कुरेशी जिथे निवडणूक लढवत आहेत त्या ९२ प्रभागामध्ये १५ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. यामध्ये शिंदेंच्या शिवसेनेकडून हाजी कुरेशी उमेदवार आहेत. तर शिवसेना ठाकरे गटाकडून अरुण कांबळे उमेदवार आहेत.

## भाजपचं पत्र समोर; पण चर्चा काँग्रेसच्या

**अकोला :** अकोट नगरपालिकेत सत्ता मि ळवण्यासाठी भाजपनं थेट एमआयएमशी युती केली. बटेंगे तो कटेंगेची घोषणा देणाऱ्या भाजपनं थेट एमआयएमशी युती केल्याचे तीव्र पडसाद उमटले. याची चर्चा देशभरात झाली. दस्तुरखुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावर भाष्य करत नाराजी बोलून दाखवली. कारवाईचे संकेत दिले. यानंतर आता एक महत्त्वाची घडामोड समोर आली आहे.अकोला जिल्ह्यातील अकोट नगरपालिकेत भाजप-एमआयएम ची युती झाल्यानं राजकीय वतुर्ळात खळबळ उडाली. भाजपचं हिंदुत्त्व गेलं कुठे, असा प्रश्न विचारला जाऊ लागला. सत्तेसाठी पक्ष कोणत्याही पातळीला जात लागल्याची खंत निष्ठावंत व्यक्त करु लागले. अनैसर्गिक युतीची चर्चा देशभरात झाली. या सगळ्यामुळे भाजपची प्रतिमा डागाळली. त्यामुळे भाजपनं अकोट विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रकाश भारसाखळे यांना पत्र लिहून खुलासा करण्याच्या सूचना केल्या आहेत.नुकत्याच झालेल्या नगर परिषद निवडणुकीत २०२५ मध्ये आपण अकोट नगर परिषदेमध्ये एम आयएम सोबत युती करुन भारतीय जनता पक्षाच्या ध्येय धोरणाला सुरंग लावला आहे.

## काँग्रेस-भाजप एकत्र, सुत्रं फिरली, युती तुटली; शिंदेसेना लाभार्थी

**ठाणे :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा बालेकिल्ला असलेल्या ठाण्यातील अंबरनाथ नगरपालिकेतील सत्ताकारणाच्या दृष्टीनं सुरु असलेल्या घडामोडी चर्चेत आहेत. शिंदे यांच्या शिवसेनेला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी भाजपनं काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसशी घरोबा केला. या विचित्र युतीचे पडसाद राज्यभर उमटले. काँग्रेस, भाजपच्या राज्य नेतृत्त्वानं या अनैसर्गिक युतीची दखल घेतली. त्यामुळे अवघ्या काही तासांत युती तुटली.अंबरनाथ नगरपालिकेत शिंदेसेनेनं सर्वाधिक जागा जिंकल्या. पण पक्षाला एकहाती सत्ता मिळवता आली नाही. नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीतही शिंदेसेनेच्या उमेदवाराचा पराभव झाला. या निवडणुकीत भाजपनं बाजी मारली. त्यानंतर शिंदेसेनेला बहुम तापासून रोखण्यासाठी भाजपनं १२ जागा जिंकणाऱ्या काँग्रेसला आणि ४ जागा जिंकणाऱ्या अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसशी हातमिळवणी केली. भाजपच्या या चालीमुळे शिंदेसेना सत्तेपासून दूर राहिली. भाजपनं केलेल्या या युतीमुळे शिंदेसेनेत नाराजी पसरली. शिंदेसेनेचे अंबरनाथचे आमदार बालाजी किणीकर यांनी संताप व्यक्त केला.एकीकडे



पंतप्रधान नरेंद्र मोदी काँग्रेसमुक्त भारतची घोषणा देत असताना अंबरनाथमध्ये भाजपनं काँग्रेसशी युती केली. या युतीचं वृत्त देशभरातील माध्यमांनी दिलं. तत्त्वांची भाषा करणारे, विचारधारा सांगणारे सत्तेसाठी काय काय करतात, कशा आघाड्या, युत्या करतात, अशी चर्चा यामुळे पुन्हा एकदा सुरु झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काँग्रेस सोबतच्या युतीबद्दल तीव्र नाराजी बोलून दाखवली. तर काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षांनी त्यांच्या १२ नगरसेवकांचं निलंबन केलं. वरिष्ठ पातळीवरुन चक्रं फिरल्यानं भाजप-काँग्रेसची युती अवघे काही तासच टिकली.अंबरनाथ नगरपालिकेत शिंदेसेनेला एकटं पाडून भाजपनं काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेसच्या मदतीनं सत्तेचा सोपान गाठला. त्यामुळे सर्वाधिक जागा जिंकूनही शिंदेसेनेला सत्तेपासून दूर राहावं लागलं.

## भाजप-काँग्रेसची युती, विकेट पडली; प्रदेशाध्यक्षांनी फर्मान काढलं

**ठाणे :** अंबरनाथ नगरपालिकेत भाजप सोबत केलेली युती काँग्रेस च्या स्थानिक नेत्यांना महागात पडली आहे. सर्वाधिक जागा जिंकणाऱ्या शिंदेसेनेला सत्तेपासून दूर राखण्यासाठी भाजपनं काँग्रेस सोबत हातमिळवणी केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या अनैसर्गिक युतीबद्दल नाराजी व्यक्त करत असताना दुसरीकडे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. अंबरनाथ ब्लॉक काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रदीप पाटील यांची हकालपट्टी करण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्याकडून पाटील यांच्या निलंबनाचे आदेश काढण्यात आले आहेत. ’आपण अंबरनाथ नगरपालिका निवडणुकीमध्ये काँग्रेस पक्षाच्या चिन्हावर निवडणूक




लढवली असून आपल्या पक्षाचे बारा सदस्य निवडून आलेले आहेत. मात्र आपण प्रदेश कार्यालयात कोणतीही माहिती न देता अंबरनाथ नगरपालिकेमध्ये भारतीय जनता पक्षाच्या सदस्यांसोबत गटबंधन केल्याचे प्रसार माध्यमांद्वारे कळाले. ही बाब अत्यंत चुकीची असून पक्षस्थितीचा भंग करणारी आहे,’ असं पाटील यांना पाठवण्यात आलेल्या पत्रात नमूद करण्यात आलं आहे.अंबरनाथ ब्लॉक काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रदीप पाटील यांचं निलंबन करण्यात आलं आहे. सोबतच पाटील यांची ब्लॉक काँग्रेस कार्यकारिणी बरखास्त करण्यात आली आहे. त्याच प्रमाणे आपल्या सोबत पक्षशिस्तीचा भंग करणाऱ्या सर्व नगरसेवकांनासुद्धा पक्षाम धून निलंबित करण्यात येत आहे, असा उल्लेख पत्रात आहे.अंबरनाथ नगरपालिकेत भाजपनं सर्वाधिक जागा जिंकणाऱ्या शिंदेसेनेला सत्तेपासून दूर राखण्यासाठी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसला सोबत घेतलं. अंबरनाथमध्ये भाजपचे १६ आणि काँग्रेसचे १२ नगरसेवक निवडून आले आहेत. तर अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे ४ नगरसेवक आहेत. भाजपनं काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसला सोबत घेत शिंदेसेनेला सत्तेपासून दूर ठेवलं. या विचित्र युतीची राज्यभरात चर्चा झाली. त्यानंतर काँग्रेसनं त्यांच्या पदाधिकारी आणि नगरसेवकांवर कारवाई केली आहे. एकीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी काँग्रेसमुक्त भारतची घोषणा देत असताना दुसरीकडे अंबरनाथमध्ये भाजपनं थेट काँग्रेसशी युती केली. या युतीमुळे शिंदेसेनेला सत्तेपासून दूर राहावं लागलं. ही विचित्र आणि अनैसर्गिक युती सर्वत्र चर्चेचा विषय ठरली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या युतीबद्दल तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली. त्यांनी कारवाईचा इशारादेखील दिला. पण भाजपनं कारवाई करण्याआधी काँग्रेसच्या राज्य नेतृत्त्वानं निलंबनाचा बडगा उगारला आहे.

# भावजयसोबत प्रेमसंबंध अनब काकाने १३ वर्षांचा पुतण्याला संपवलं, मग २४ तासात

**धाराशिव :** तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी पोलिस स्टेशनच्या हद्दीत दीर-भावजयीच्या प्रेमसंबंधांची पोलखोल वडिलांपर्यंत पोहोचवत असल्याचा राग मनात धरून चुलत्याने आपल्या १३ वर्षीय पुतण्याचा दिवसाढवळ्या निर्घृण खून केला. ही संतापजनक घटना तामलवाडी साठवण तलावाजवळ उघडकीस आली आहे. मात्र, सहाय्यक पोलिस निरीक्षक गोकुळ ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली तामलवाडी पोलिसांनी अवघ्या २४ तासांत खुनाचा छडा लावत आरोपीला बेड्या ठोकल्या.सोलापूर – धुळे राष्ट्रीय महामार्गालगत तामलवाडी शिवारात कदम यांची शेती आहे. सदर शेती दत्ता कोरे हे बटाईने करीत होते. उमरगा तालुक्यातील कोळसूर गावचा ओमकार देवीदास कांबळे हा आपल्या भावजय ज्योती कांबळे हिच्यासह सालगडी म्हणून काम करत होता. ज्योती कांबळे यांचा १३ वर्षीय मुलगा कृष्णा उर्फ सदानंद कांबळे हा कधी वडिलांकडे तर कधी आईकडे राहत होता.कृष्णा हा आई आणि चुलता यांच्यातील अनैतिक संबंधांची माहिती आपल्या वडिलांना देत असल्याने तो दीर-भावजयीच्या प्रेमसंबंधात अडसर ठरत होता. याच रागातून १ जानेवारी रोजी दुपारी



१२ वाजण्याच्या सुमारास, आरोपी ओमकार कांबळे याने तलावातील पाणी उपसा करणाऱ्या विद्युत पंपाचा पाईप बसवण्याच्या बहाण्याने कृष्णाला तामलवाडी साठवण तलावाजवळ नेले. तेथे कुऱ्हाडीचे सपासप वार करून कृष्णाचा निर्घृण खून केला आणि मृतदेह तलावाशेजारील गवतामध्ये फेकून आरोपी पसार झाला.५ जानेवारी रोजी सायंकाळी ४ वाजण्याच्या सुमारास, धनाजी नेटके हे तलाव परिसरात जनावरे चरत असताना गवतामधून मृतदेहाचे पाय दिसून आले. त्यांनी तत्काळ तामलवाडी पोलिसांना माहिती दिली. सहाय्यक पोलिस निरीक्षक गोकुळ ठाकूर यांनी पथकासह घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. मृतदेहावरील गंभीर जखमांवरून हा खून असल्याचे स्पष्ट झाले. प्रथम अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली. मात्र,सहाय्यक पोलिस निरीक्षक ठाकूर यांनी तपासाची सूत्रे अत्यंत काटेकोरपणे हाती घेतली आणि काही तासांतच संशयाची सुई चुलता ओमकार कांबळे याच्याकडे स्थिरावली.कृष्णा कांबळे खूनप्रकरणी तपास सुरू करताना तामलवाडी पोलिसांनी प्रथम बसस्थानक परिसरात शोधमोहीम राबवली. त्यानंतर आरोपीचा मोबाईल लोकेशन ट्रेस करत पथक थेट तलमोड, उमरगा तालुका येथील टोलनाक्यापर्यंत पोहोचले. पुढे कोळसूर गावात आरोपी ओमकार देवीदास कांबळे हा घरी परतत असतानाच तामलवाडी पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. मंगळवारी, रात्री त्यास तामलवाडी पोलिस ठाण्यात आणून पुढील कायदेशीर कारवाई सुरू करण्यात आली आहे.

## वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने पुण्यातील लॉजमध्ये आयुष्य संपवलं

**पुणे :** महाराष्ट्र पोलिस दलातून एक अत्यंत हृदयद्रावक बातमी समोर आली आहे. सांगली पोलिस दलात कार्यरत असलेल्या एका तरुण पोलिस अधिकाऱ्याने पुण्यात विष पिऊन आपली जीवनयात्रा संपवली आहे. सुरज मराठे असे या २५ वर्षीय सहाय्यक पोलिस निरीक्षकाचे नाव असल्याची माहिती आहे. त्यांच्या या टोकाच्या निर्णयामुळे पोलिस वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.याप्रकरणी मिळालेल्या माहितीनुसार, सुरज मराठे हे सांगली जिल्ह्यातील तासगाव पोलिस ठाण्यात नियुक्त होते. गेल्या काही काळापासून त्यांना गुडघ्यांचा तीव्र त्रास होत होता. याच शारीरिक व्याधीवर उपचार घेण्यासाठी त्यांनी रजा घेतली होती आणि ते पुण्यात आले होते. पुण्यातील डेक्कन परिसरातील एका लॉजमध्ये ते थांबलेले होते. उपचार घेतल्यानंतर ते लॉजवर परतले त्यानंतर त्यांनी विष प्राशन केल्याची माहिती आहे. हा प्रकार उघडकीस येताच परिसरात प्रचंड खळबळ उडाली आहे.

सुरज मराठे यांचे कुटुंबीय पुणे जिल्ह्यातील देहू येथे राहतात. अत्यंत कमी वयात पोलिस दलात अधिकारी पदावर झेप घेणाऱ्या या तरुण अधिकाऱ्याने केवळ शारीरिक त्रासामुळे आयुष्य संपवल्याने एकच हळहळ व्यक्त होत आहे. घटनास्थळी पोलिसांना एक सुसाईड नोट सापडली असून, त्यात त्यांनी आपल्या आजारपणाचा उल्लेख केला आहे. सध्या डेक्कन पोलिस या प्रकरणाचा सखोल तपास करत आहेत.

## शेतात सांगाडा ; ही तर माझ्या बायकोची साडी

**लखनऊ :** एका मोहरीच्या शेतात महिलेचा सांगाडा सापडून आल्याने एकच खळबळ उडाली होती. उत्तर प्रदेशची राजधानी लखनऊमधील नागराम पोलिस स्टेशन परिसरातून ही घटना घडल्याची माहिती आहे. येथे बुधवारी कुभारा गावात मोहरीच्या शेतात हा सांगाडा सापडल्यानंतर गावकऱ्यांनी पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी तात्काळ घटनास्थळ गाठलं आणि सांगाडा जप्त केला.पोलिसांना घटनास्थळाजवळ एक साडीही सापडली आहे. ही साडी गावातून बेपत्ता असलेल्या कुठल्या महिलेची असू शकते, असा संशय पोलिसांना आला. तेवढ्यात घटनास्थळी पोहोचलेल्या पितांबर यांनी ती साडी त्यांची पत्नी पूनम यांची असल्याचं ओळखलं. ३० वर्षांची पूनम ही १३ डिसेंबर २०२५ पासून बेपत्ता असल्याची तक्रारही नागराम पोलीस स्टेशनमध्ये दाखल करण्यात आली होती.धक्कादायक बाब म्हणजे, ज्या ठिकाणी सांगाडा सापडला ते ठिकाण पितांबरच्या घरापासून सुमारे ३०० मीटर अंतरावर आहे. सांगाडा सापडल्याची बातमी मिळताच, मृत महिलेच्या कुटुंबातील सदस्यांनी घटनास्थळी धाव घेतली. पूनमची हत्या झाल्याचा आरोप त्यांनी कला आहे. पूनमची हत्या करून तिचा मृतदेह शेतात फेकून देण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला आहे.याप्रकरणी डीसीपी निपुण अग्रवाल यांनी दिलेल्या माहितीनुसार, ७ जानेवारी २०२५ ला कुभारा गावातील रहिवासी चंद्रप्रकाश यांनी मोहरीच्या शेतात सांगाडा आढळल्याची माहिती



दिली होती. पोलीस घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी पाहिलं तेव्हा हा सांगाडा विकृत अवस्थेत पडलेला आढळून आला. त्यामुळे त्याची ओळख पटवणे कठीण झाले होते.

पितांबरच्या जबाब आणि जवळच सापडलेल्या साडीवरून सुरुवातीला तो पूनमचा असल्याचा संशय आहे.पूनमला दोन मुलं आहेत. ती शेजारच्या एका व्यक्तीशी बोलत असल्याचा दावाही करण्यात आला आहे. बेपत्ता होण्याच्या दोन महिने आधी तिच्या पतीने फोनवर बोलण्यासाठी तिचा मोबाईल हिसकावून घेतला होता, ज्यामुळे ती मानसिक तणावात होती. पोलिसांनी हा सांगाडा शवविच्छेदन तपासणीसाठी पाठवण्यात आला आहे. डीएनए चाचणी आणि शवविच्छेदन अहवालानंतरच मृत्यूची ओळख आणि कारण स्पष्ट होईल असे पोलिसांचे म्हणणे आहे.

## फोन करुन खंडणी मागितली, पोलिसांनी मोठा डाव उधळला..

**नागपूर :** दक्षिण भारतातील गाजलेल्या 'विक्रम' आणि 'शिवाजी द बॉस' या थ्रिलर चित्रपटांमधून प्रेरणा घेत ५० लाख रुपयांची खंडणी उकळण्याचा सिनेस्टाईल कट नागपूर पोलिसांनी वेळेवर कारवाई करत उधळून लावला आहे. बेलतरोडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आलेल्या या प्रकरणात भंडारा येथील भूमी अभिलेख कार्यालयातील एका महिला कर्मचाऱ्यासह पाच आरोपींना अटक करण्यात आली आहे. बहिणीच्या लग्नासाठी आर्थिक अडचणीत असलेल्या मुख्य आरोपीने चित्रपटातील पद्धतींचा अवलंब करत हा गुन्हा केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.या प्रकरणातील तक्रारदार प्रकाश ढगे हे भंडारा येथील भूमी अभिलेख कार्यालयात उपअधीक्षक पदावर कार्यरत आहेत. १७ डिसेंबर रोजी भंडाऱ्यातील काम आटोपून नागपूरकडे परत येत असताना वेळाहरी बायपास



रोडवर आरोपींनी ढगे यांची कार अडवली. कारच्या मागील काच आणि समोरील दरवाज्याच्या काचा फोडून भीतीचे वातावरण निर्माण करत आरोपी घटनास्थळावरून पसार झाले. या घटनेनंतर १९ डिसेंबर रोजी ढगे यांना अज्ञात क्रमांकावरून धमकीचा फोन आला. “तुला मारण्यासाठी २० लाखांची सुपारी देण्यात आली आहे. जीव वाचवायचा असेल तर ५० लाख रुपये दे,” अशी थेट धमकी देत आरोपींनी जबलपूर रिंगरोडवरील महादेव ढाब्यावर पैसे आणण्यास सांगितले. प्रसंगावधान राखत ढगे यांनी तात्काळ बेलतरोडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी सापळा रचला. बनावट नोटांनी भरलेली बॅग ढगे यांच्याकडे देऊन ठरलेल्या ठिकाणी पाठवण्यात आले. मात्र अंधाराचा फायदा घेत आरोपी बॅग घेऊन पसार झाले. त्यानंतर आरोपींनी सतत सिमकार्ड आणि मोबाईल फोन बदलत वेगवेगळ्या ठिकाणी पैसे आणण्यास सांगण्यास सुरुवात केली. २९ डिसेंबर रोजी पुन्हा धमकीचा फोन करून ढगे आणि त्यांच्या कुटुंबाला जिवे मारण्याची धमकी देण्यात आली.पोलिसांनी तांत्रिक तपास करत मोबाईल कॉल डिटेल्स, लोकेशन ट्रॅकिंग आणि सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपासाची चक्रे वेगाने फिरवली. नागपूर, भंडारा, गोंदिया आणि चंद्रपूर जिल्ह्यांत छापे टाकून अखेर सर्व आरोपींना अटक करण्यात आली. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये अतुल अनिल तागडे (वय ३०, रा. देवरी, गोंदिया), राहुल मीताराम पटले (वय २१), हिंदुस्तान वासुदेव रामटेके (वय २७), निखिल राजू नांदेकर (वय २८) आणि प्रेक्षा बाबू कांबळे (वय ३०) यांचा समावेश आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, अतुल तागडे हा देवरी येथे मोबाईल शॉपी चालवतो. तो बहिणीच्या लग्नासाठी मोठ्या आर्थिक अडचणीत होता. प्रेक्षा कांबळे ही त्याची मावस बहीण असून ती भंडारा येथील भूमी अभिलेख कार्यालयात लिपिक म्हणून कार्यरत आहे. तिनेच कार्यालयीन माहितीच्या आधारे ढगे यांच्याकडे मोठी अवैध संपत्ती असल्याची माहिती तागडेला दिल्याचा आरोप आहे. याच माहितीवरून ढगे यांना 'टार्गेट' करून सिनेस्टाईल खंडणीचा कट रचण्यात आला. सध्या सर्व आरोपी पोलीस कोठडीत असून पुढील तपास सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

# वैभवची तुफानी खेळी, १९ चेंडूंतच ९८ धावा




**बेनोनी :** वैभव सूर्यवंशीची तुफानी फलंदाजी पाहण्याचा योग पुन्हा एकदा आज चाहत्यांना आला. वैभवने या सामन्यात अशी दणकेबाज फलंदाजी केली की, त्याच्यापुढे दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजांना पुरते लोटांगण घालायला लागले. वैभवने या सामन्यात फक्त १९ चेंडूंत ९८ धावा फटकावल्या, तर या सामन्यात ७४ चेंडूंत किती धावा केल्या, हे आता समोर आले आहे.भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील तिसरा वनडे सामना सुरु आहे. या सामन्यात भारताने टॉस जिंकला आणि कर्णधार वैभवने प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाचा भारताने चांगलाच फायदा उचलला. कारण वैभव सूर्यवंशी तर यावेळी गोलंदाजांवर तुटून पडला. पहिल्या षटकापासून त्याने धडाकेबाज फटकेबाजी करायला सुरवात केली. गेल्या सामन्यात वैभवने आपले अर्धशतक फक्त षटकारांच्याच जोरावर पूर्ण केले होते, ८ षटकारांच्या जोरावर वैभवने आपले अर्धशतक साकारले होते. या सामन्यातही वैभवने तशीच धमाकेदार फटकेबाजी केली आणि त्यामुळेच दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजांचे तोंडचे पाणी पळवले. वैभवला यावेळी दुसरा सलामीवीर आरोन जॉर्जचीही चांगली साथ मिळाली. कारण वैभव पाठोपाठ त्यानेही आपले शतक पूर्ण केले.वैभव आणि आरोन या दोघांनी दमदा फटकेबाजी करत तब्बल २२७ धावांची सलामी दिली. यावरून भारताची कशी दणक्यात सुरुवात झाली, हे समजता येऊ शकते. पण या २२७ धावांत मोठा वाटा हा वैभवचा होता. वैभवने या सामन्यात फक्त १९ चेंडूंत ९८ धावा केल्या होत्या, पण या सामन्यात तो ७४ चेंडू खेळला. या ७४ चेंडूंत ९ चौकार आणि १० षटकारांच्या जोरावर वैभवने १२७ धावांची दिमाखदार खेळी साकारली. वैभवच्या या फटकेबाजीच्या जोरावर भारताला प्रथम फलंदाजी करताना ५० षटकांत ३९३ धावांचा डोंगर उभारता आला आणि विजयाच्या दिशेने एक महत्वाचे पाऊल टाकता आले.वैभवने सलग दुसऱ्या सामन्यात आक्रमक फटकेबाजी केली आणि त्यामुळेच भारताला मोठी धावसंख्या उभारता आली. वैभवच्या फलंदाजीने भारताने मोठी धावसंख्या तर उभारली प भारत हा सामना जिंकणार की नाही, याची उत्सुकता चाहत्यांना नक्कीच असणार आहे.

## सचिन होणार सासरे! अर्जुन-सानियाच्या लग्नाचा मुहूर्त ठरला

**मुंबई :** मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर यांचा मुलगा आणि युवा क्रिकेटपटू ऑर्जुन तेंडुलकरच्या... यांचा मुलगा आणि युवा क्रिकेटपटू अर्क्षीप ढशपर्वीश्रझरी याच्या लग्नाचा मुहूर्त अखेर समोर आला आहे. अर्जुन तेंडुलकर आणि त्याची प्रेयसी सानिया चंडोक ५ मार्च रोजी विवाहबंधनात अडकणार आहेत. सानिया उद्योजिका असून मुंबईतील व्यावसायिक रवी घई यांची नात आहे. अर्जुन आणि सानिया यांचा साखरपुडा ऑगस्ट २०२५ मध्ये झाला होता. या सम रंभाला फक्त जवळचे मित्र आणि कुटुंबीय उपस्थित होते. सचिन तेंडुलकर यांनी नंतर एका सार्वजनिक कार्यक्रमात अर्जुनचा साखरपुडा झाल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला होता.अर्जुन-सानिया यांच्या लग्नापूर्वीचे कार्यक्रम ३ मार्चपासून सुरु होतील आणि ते प्रामुख्याने मुंबईतच होतील. अर्थात, यात फक्त जवळचे मित्र आणि कुटुंबीयच सहभागी होतील' असे एका सूत्राने सांगितले. आम्ही तेंडुलकर कुटुंबाशी अधिक माहितीसाठी संपर्क साधला, पण बातमी छापेपर्यंत त्यांच्याकडून प्रतिसाद मिळाला नाही.अर्जुनच्या साखरपुड्याची बातमी त्यावेळी गुप्त ठेवण्यात आली होती.



कुटुंबाची इच्छा होती की वैयक्तिक आयुष्यातील महत्त्वाचे क्षण खाजगी राहावेत. काही महिन्यांनंतर सचिन तेंडुलकर यांनी सार्वजनिकरित्या याबद्दल सांगितले आणि चर्चांना पूर्णविराम दिला. अर्जुनची बहीण सारा आणि सानिया मैत्रिणी असून, या माध्यम ातून काही वर्षांपूर्वी दोघांची भेट झाली होती. हळूहळू दोघांचे सूत जुळले आणि अर्जुन-सानियाची प्रेम कहाणी बहरु लागली. सत्रादरम्यान, एका चाहत्याने सचिन तेंडुलकर यांना थेट विचारले होते, की 'अर्जुनचे खरोखरच लग्न ठरले आहे का?' सचिन यांनी हसून याला दुजोरा दिला आणि म्हणाले, 'होय, त्याने साखरपुडा केला आहे आणि आम्ही सर्वजण त्याच्या आयुष्यातील या नवीन टप्प्यासाठी खूप उत्सुक आहोत.'सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आगामी लग्न सम रंभांमध्येही हाच साधापणा दिसून येईल.

## आमच्या देशाचा अपमान आहे...बांगलादेशचा माज काही कमी होत नाही, ICC वर केले आरोप

**मुंबई :** भारत आणि बांगलादेश यांच्यातील राजकीय संबंध सध्या नाजूक आहेत. India And Bangladesh यांच्यातील राजकीय वातावरण चिघळलेले असताना आता क्रिकेटवरुन नवनवीन वाद रोज रंगताना दिसत आहे. बांगलादेश आता रोज नवनवीन अटी भारतासमोर ठेवत आहे. आता बांगलादेशने आयसीसीसमोर T20 World CuP 2026 वेन्यू बदलण्याची म ागणी केली होती. यावर आयसीसीने चोख उत्तर दिले पण आता त्यावर बांगलादेशने पलटवार केला आहे.बांगलादेशचे युवा आणि क्रीडा सल्लागार आसिफ नजरुल यांनी असा प्रश्न उपस्थित केला आहे की खउउ बांगलादेशमधील परिस्थिती अद्याप पूर्णपणे समजलेली नाही. आयसीसीकडून मिळालेल्या पत्राचा हवाला देत नजरुल म्हणाले की, 'बांगलादेशने उपस्थित केलेल्या गंभीर सुरक्षेच्या चिंता या पत्रातून दिसून येत नाहीत. देशाचा कोणताही अनादर सहन करणार नाहीत.कोलकाता नाईट रायडर्सने मुस्तफिजूर रहमानला सोडल्यापासून भारत आणि बांगलादेश क्रिकेट बोर्डांमधील परिस्थिती तणावपूर्ण आहे. त्यानंतर काही वेळातच, बांगलादेश





क्रिकेट बोर्डाने त्यांच्या संघाचे टी-२० विश्वचषक सामने श्रीलंकेत हलवण्याची मागणी केली. आसिफ नजरुल म्हणाले, 'आज आम्हाला मिळालेले आयसीसी पत्र वाचून आम्हाला समजले आहे की त्यांना भारतात बांगलादेशी क्रिकेटपटूंना भेडसावणाऱ्या गंभीर सुरक्षा परिस्थितीची पूर्णपणे कल्पना आलेली नाही. मला वाटते की ही केवळ सुरक्षेची समस्या नाही तर देशाचा अपमान आहे. तरीही, आम्ही याला प्रामुख्याने सुरक्षेचा मुद्दा मानत आहोत.'आसिफ नजरुल पुढे म्हणाले की, 'बांगलादेशमध्ये क्रिकेटबद्दल प्रचंड आवड आहे आणि संघ निश्चितच विश्वचषकात खेळू इच्छितो. आम्हाला भारतातील सांप्रदायिक परिस्थितीवर चर्चा करायची नाही, परंतु जेव्हा आपल्या क्रिकेटपटूंच्या सुरक्षिततेचा आणि बांगलादेशच्या सन्म ानाचा प्रश्न येतो तेव्हा हा प्रश्न उद्भवणे निश्चित आहे. जेव्हा भारतीय क्रिकेट बोर्ड स्वतः कोलकाता नाईट रायडर्सना सांगत आहे की ते या विशिष्ट खेळाडूला सुरक्षा देऊ शकत नाही आणि त्याला वगळण्यास सांगितले आहे, तेव्हा हे दर्शवते की भारतात खेळणे आपल्यासाठी सुरक्षित नाही.' आयसीसीने बांगलादेशला भारतात खेळायला जा अन्यथा तुम्हाला गुण गम वावे लागतील, असा इशारा आयसीसीने बांगलादेशसोबत झालेल्या ऑनलाईन बैठकीत झाला.

## हिंदूवरील भ्याड हल्ल्यांवर शिखर धवन भडकला

**नवी दिल्ली :** बांगलादेशमध्ये निष्पाप हिंदूवर भ्याड हल्ले केले जात आहेत. बांगलादेशमध्ये हिंदूवर होणारे अत्याचार हे संपूर्ण जग पाहत आहे. आतापर्यंत एकाही क्रिकेटपटूने बांगलादेशाबाबत विधान केले नव्हते. पण भारताचा माजी सलामीवीर शिखर धवन आता बांगलादेशमध्ये होणाऱ्या हिंदूवरील हल्ल्यावर भडकला आहे.बांगलादेशमध्ये अस्थिर वातावरण आहे. बांगलादेशमधील लोकं हिंदू धर्मियांवर प्राणघातक हल्ले करत आहेत, ज्यामध्ये काही हिंदूना जीवही गमवावा लागला आहे. त्यामुळे बांगलादेशच्या खेळाडूंना भारतात प्रवेश देऊ नये, अशी भारतीयांची भावना होती. पण सुरुवातीला बीसीसीआयने ही गोष्ट मान्य केली नाही. पण भारतीयांचा राग जसा वाढला, तसे बीसीसीआयला नमते घ्यावे लागले. बीसीसीआयने भारताचा बांगलादेशचा जाहीर केलेला दौरा स्थगित केला. त्याचबरोबर आयपीएलमधून बांगलादेशच्या मिस्ताफिझूर रेहमानला बाहेरचा रस्ता दाखवला. बांगलादेशने त्यानंतर आपण भारतात टी २० वर्ल्ड कप

### रागाच्या भरात म्हणाला ही गोष्ट कधीच स्विकार..





खेळमार नसल्याची धमकी आयसीसीला दिली. पण आयसीसीने त्याला भीक घातली नाही. क्रिकेटबबात बऱ्याच घडामोडी घडत असताना एकही क्रिकेटपटू याबाबत कधीच बोलला नव्हता, पण आता शिखर धवनने मात्र आपले मौन सोडले आहे.शिखर धवन म्हणाला की, ' बांगलादेशमध्ये एका हिंदू विधवावर क्रूरपणे जो अमानुष अत्याचार झाला, हे वाचून वाईट वाटलं. कोणत्याही व्यक्तीबरोबर अशी हिंसा कधीच होऊ नये, असे मला वाटते. या गोष्टीचा स्विकार कधीच होऊ शकत नाही. जी पिडीत व्यक्ती आहे तिला न्याय मिळायला हवा, असे मला वाटते. त्यासाठी मी प्रार्थना करतो. या घटना बांगलादेशमधील जे अल्पसंख्याक हिंदू आहेत, त्यांच्यासुरक्षेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारी आहे, याचाही विचार करायला हवा. 'शिखर धवनने आपाल राग व्यक्त करताना बांगलादेशमधील हिंदूच्या सुरक्षेचे काय, असा प्रश्न यावेळी उपस्थित करत आपला राग व्यक्त केला आहे. बांगलादेशमध्ये हिंदूवर होणारे कसे अत्याचार होत आहे, हेदेखील शिखर धवनने यावेळी सांगितले आहे.बांगलादेशमध्ये हिंदूवर सातत्याने हल्ले केले जात आहेत. हे हल्ले नेमके थांबणार तरी कधी आणि तिथल्या हिंदूना सुरक्षित वाटणार कधी, हा सर्वात महत्वाचा प्रश्न आहे.

# सागरिका घाटगेने झहीर खानसोबतच्या अंतरधर्मीय विवाहाबद्दल बोलताना केले खुलासे

**मुंबई :** बॉलिवूड अभिनेत्री सागरिका घाटगेआणि माजी क्रिकेटपटू झहीर खान यांना नुकतेच मुलगा झाला असून त्याचे नाव फतेहसिंह खान ठेवण्यात आले आहे. या आनंददायी बातमीची घोषणा सागरिकाने सोशल मिडियावर केली आणि बाळाचे पहिले फोटो शेअर करत सर्वांना हा आनंदात सहभागी होण्याची संधी दिली. त्यांनी सांगितले, 'प्रेम, कृतज्ञता आणि दैवी आशीर्वादासह आम्ही आमच्या प्रिय लहान बाळाचे स्वागत करतो, फतेहसिंह खान.'

सागरिका आणि झहीर यांची जोडी सोशल मिडियावर नेहमीच चाहत्यांच्या मनात उठते. त्यांनी जेव्हा आपले पहिले फोटो शेअर केले, तेव्हा चाहत्यांमध्ये आनंदाचा धुमाकूळ उडाला. प्रत्येक पोस्टमध्ये त्यांची जोडी अप्रतिम दिसते आणि या नव्या बाळाच्या आगमनामुळे त्यांच्या घरात सुख-समृद्धीची चाहूल जाणवते. याआधी सागरिका घाटगेने झहीर खानसोबतच्या अंतरधर्मीय विवाहाबाबतही उघडपणे बोलले होते. त्या म्हणाल्या की, 'माझे पालक खूप प्रगत विचारसरणीचे आहेत आणि त्यांनी माझ्या निर्णयाला संपूर्ण पाठिंबा दिला. मात्र, सुरक्षेच्या दृष्टीने माझ्या वडिलांनी झहीरची पार्श्वभूमी तपासली होती, जे काहीही काळजी घेणाऱ्या वडिलांनी करणे अपेक्षित आहे.' सागरिकाने आपल्या वडिलांनी केलेल्या पार्श्वभूमी तपासणीचा किस्सा सांगितला. त्या म्हणाल्या, 'माझ्या वडिलांना जेव्हा माहिती मिळाली, तेव्हा त्यांनी झहीरच्या कोच अंशुमान गायकवाड यांच्याकडे विचारले, कारण ते आमच्याशी काहीतरी नात्याने संबंधित होते. कोचने झहीरला संदेश पाठवला की, 'माझ्या बहीणीसोबत तू मित्र आहेस असे ऐकले.' झहीर म्हणाला, 'मी उत्तर देणार नाही,' आणि मी म्हणाले, 'उत्तर देऊ नकोस, मला काहीच माहिती नाही.' त्यांनी पुढे म्हटले की, 'वडिलांनी झहीरची पार्श्वभूमी व्यवस्थित तपासली आणि त्यांचे म्हणणे होते, 'तो एक छान क्रिकेटपटू आहे.' वडिलांसाठी ही तपासणी महत्त्वाची होती.' सागरिका घाटगेने त्यांच्या विवाहातील धार्मिक भिन्नतेबाबतदेखील बोलले. त्या म्हणाल्या, 'माझ्या पालकांनी माझ्या निर्णयाला पाठिंबा दिला आणि नक्कीच काही चर्चा झाल्या, पण माझ्यासाठी महत्त्वाचे होते की मला असा योग्य व्यक्ती मिळावा ज्याच्यासोबत मी माझं आयुष्य शेअर करू शकेन.ङ्ख त्यांनी पुढे सांगितले, 'आम्ही दोघेही स्वतंत्र व्यक्तिमत्वाचे आहोत आणि हीच आमच्या नात्याची खासियत आहे.' सागरिका आणि झहीर यांचा विवाह आणि बाळाच्या आगमनामुळे त्यांच्या चाहत्यांमध्ये आनंदाची लहर पसरली आहे. तसेच, अंतरधम र्िय विवाहाबाबत त्यांनी व्यक्त केलेला आधुनिक दृष्टिकोन आणि पारिवारिक सहकार्य हा अनेकांसाठी प्रेरणादायी ठरला आहे. या नव्या बाळामुळे दोघांच्या जीवनात नवीन सुख-समृद्धी आलेली दिसत आहे आणि चाहत्यांना त्यांच्या कुटुंबातील या आनंदात सहभागी होण्याची संधी मिळाली आहे. याशिवाय, सागरिका आणि झहीर दोघेही सोशल मिडियावर सक्रिय आहेत आणि त्यांच्या जीवनातील या महत्वाच्या टप्प्याचे फोटो आणि पोस्ट शेअर करत चाहत्यांशी जवळीक कायम ठेवतात. त्यांच्या व्यक्तिमत्वातील प्रेम, आदर आणि व्यावहारिकतेची छाप या पोस्टमधून स्पष्ट दिसते.





## 'टॉक्सिक'मध्ये हुमा कुरैशीची एंट्री

**मुंबई :** यशची मुख्य भूमिका असलेला 'टॉक्सिक' हा चित्रपट नव्या वर्षातील सर्वात बहुप्रतीक्षित चित्रपटांपैकी एक आहे. निर्माते आता यातील प्रत्येक व्यक्तिरेखेसंबंधी माहिती उघड करत आहेत. यापूर्वी कियारा अडवाणीचा लुक समोर आला होता. आता चित्रपटात आणखी एका बॉलिवूड अभिनेत्रीची एंट्री झाली असून तिचा लुकही समोर आला आहे. 'टॉक्सिक'मध्ये यशसोबत कियारा अडवाणीची जोडी जमणार असून आता आणखी एका अभिनेत्रीची एंट्री झाली आहे. हुमा कुरैशी ही 'टॉक्सिक' या चित्रपटात महत्त्वाची भूमिका साकारणार आहे. चित्रपटातील तिचा लुक जारी करण्यात आला असून यात ती किलर वाटतेय. ब्लॅक विंटेज कारसमोर ब्लॅक ड्रेसमध्ये उभी 'टॉक्सिक'ची एलिझाबेथ उर्फ हुमा कुरैशीचा लुक पाहण्याजोगा आहे.

टॉक्सिक फेयरी टेल फॉर ग्रोन-अप्समध्ये एलिझाबेथ झालेल्या हुमा कुरैशीला एंट्रोड्यूस करत आहोत, असे यशने पोस्टला शेअर करत नमूद पेले आहे. यशचा हा चित्रपट १९ मार्च रोजी प्रदर्शित होणार आहे. त्याचदिवशी आदित्य धरकडून दिग्दर्शित 'धुरंधर २' हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. धुरंधर या चित्रपटाची क्रेझ पाहता 'टॉक्सिक'च्या कलेक्शनवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.



## पबमध्ये नाचताना तमन्नाचा व्हिडीओ व्हायरल

### ६ मिनिटांच्या डान्ससाठी मिळाले ६ कोटी!

**मुंबई :** गोव्यात न्यू इअर पार्टीच्या निमित्ताने बागा बीच येथील लास ओलास बीच क्लबमध्ये भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात तमन्नाने तिचा अत्यंत लोकप्रिय आयटम साँग सादर केला, ज्यामध्ये तिने फक्त ६ मिनिटांसाठी तब्बल ६ कोटी रूपये घेतले, असे मीडिया रिपोर्ट्समध्ये सांगितले गेले आहे. म्हणजेच, प्रत्येक मिनिटासाठी तिने १ कोटी रूपये कमावले, हा आकडा पाहून चाहत्यांमध्ये आणि सोशल मीडियात मोठी चर्चा सुरू झाली आहे.

या कार्यक्रमात तमन्ना भाटियासोबतच अभिनेत्री सोनम बाजवा आणि गायक मिलिंद गाबा यांनीही स्टेज शेअर करून धमाकेदार परफॉर्मन्स दिला. तमन्नाने तिच्या गाण्यावर अद्भुत एनर्जी आणि स्टेज प्रेझेन्स दाखवली, ज्याचा व्हिडिओ सोशल मीडियात सध्या प्रचंड व्हायरल होत आहे. चाहत्यांनी तिच्या डान्स आणि स्टाइलचे कौतुक केले आहे, तर काहीजण तिच्या परफॉर्मन्सवर प्रतिक्रिया देत '६ मिनिटांसाठी ६ कोटी' हा रेकॉर्डबद्ध मानधन पाहून थक्क झाले आहेत.

तामन्नाच्या या परफॉर्मन्समुळे सध्या ती सिनेसृष्टीत चर्चेचा केंद्रबिंदू ठरली आहे. आयटम सांग्ससाठी तिच्या वाढत्या डिमांडमुळे निर्माते आणि इव्हेंट आयोजकही तिच्याशी संपर्क साधत आहेत. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, तिचा जलद गतीचा डान्स, स्टेजवरील आत्मविश्वास आणि चाहत्यांशी संवाद साधण्याची क्षमता हीच तिला इतर कलाकारांपेक्षा वेगळे स्थान देत आहे.

सोशल मीडियावर व्हिडिओ क्लिप्स प्रचंड व्हायरल होत असल्यामुळे तमन्ना भाटियाची लोकप्रियता अधिकच वाढली आहे. तिच्या चाहत्यांनी कमेंट्समध्ये कौतुक करत तिला 'नृत्य राणी' आणि 'आयटम क्वीन' अशा टॅग्स दिल्या आहेत. या परफॉर्मन्समुळे तिच्या आगामी प्रोजेक्ट्सम ध्ये आयटम सांग्ससाठी तिच्या सहभागाची डिमांड अधिक वाढण्याची शक्यता आहे. यावेळी आयोजित झालेल्या न्यू इअर पार्टीत तमन्नाचा परफॉर्मन्स केवळ चाहत्यांसाठीच नाही तर मीडियासाठीही आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला. तिच्या चमकदार पोशाख, स्टाइलिश नृत्य पद्धती आणि स्टेजवरील कमांडमुळे कार्यक्रमाला यश मिळाले. तिने आयटम सांग्ससोबतच स्टेजवर प्रेक्षकांना थिरकण्याची संधीही दिली, ज्यामुळे कार्यक्रमाची ऊर्जा प्रचंड वाढली. सामाजिक मीडिया आणि मीडियाचे माध्यम पाहता, तमन्ना भाटियाचा हा ६ मिनिटांचा परफॉर्मन्स तिच्या करिअरमध्ये एक ऐतिहासिक क्षण ठरला आहे. तिच्या या कामगिरीमुळे ती सिनेसृष्टीत फक्त लोकप्रियच नाही तर 'उच्च मानधन घेणारी स्टार' म्हणूनही ओळखली जात आहे.

# हरभऱ्यावर घाटेअळीचे एकात्मिक व्यवस्थापन करण्याचे आवाहन...

जनसंचलन/बुलढाणा

जिल्ह्यातील बहुतांश भागात हरभऱ्याचे पीक फुलोरा अवस्थेत असून या कालावधीत घाटेअळीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता अधिक आहे. घाटेअळी ही हरभऱ्याची प्रमुख कीड असून तिच्यामुळे फुले व घाट्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. त्यामुळे शेतकऱ्यांनी वेळेवर एकात्मिक पद्धतीने व्यवस्थापन करावे, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी केले आहे. घाटेअळीची मादी पतंग पानांवर, कोवळ्या शेंड्यांवर, कळ्यांवर व फुलांवर एकेरी अंडी घालते. अंड्यातून २ ते ३ दिवसांत अळी बाहेर पडून प्रथम पानावरील हरितद्रव्य खरडून खाते. पुढे अळ्या संपूर्ण पाने, देठे तसेच फुले व घाटे खातात. मोठ्या अळ्या घाट्यांना छिद्र पाडून आतील दाणे खाऊन पाटे पोखरतात. एक अळी साधारणतः ३० ते ४० घाट्यांचे नुकसान करू शकते. एकात्मिक व्यवस्थापन : १) घाटे अळीचे परभक्षक बगळे, मैना, राघो, निळकंठ, काळी चिमणी इत्यादी पिकामधे फिरून घाटे अळया वेचून त्यांचे पिकावरील नियंत्रण करतात. अवाजवी किटकनाशकाची फवारणी केल्यास पक्षी किटकनाशकांच्या वासामुळे शेतामधे येणार नाहीत. २) ज्या शेतामधे मका किंवा ज्वारीचा नैसर्गिक पक्षी थांबे म्हणुन उपयोग केला नसेल त्या शेतामधे बांबुचे त्रिकोणी पक्षी थांबे (प्रती हेक्टर २० पक्षी थांबे ) तयार करून शेतामधे लावावे. त्यामुळे पक्षांचे अळया वेचण्याचे काम सोपे होते. ३) घाटे अळीचे कामगंध सापळे (हेक्झाल्युर) एकरी दोन किंवा हेक्टरी पाच सापळे याप्रमाणे लावावेत. सापळ्यामधे सतत तीन दिवस आठ ते दहा पंतग आढळल्यास किड व्यवस्थापनाचे उपाय राबवावे. (४) शेतकरी बंधुनी आपल्या पिकाचे निरीक्षण करून किडींचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान संकेत पातळीच्यावर(१ ते २ अळया प्रति मिटर ओळ) आढळून आल्यास किंवा ४० ते ५० टक्के पिक फुलोऱ्यावर आल्यानंतर घाटेअळीचे व्यवस्थापनासाठी निंबोळी अर्क ५ टक्के किंवा एच.ए.एन.पि.व्हि (११०१ पिओबी/ मिली) ५०० एल.ई./ हे. किंवा क्विनॉलफॉस २५ ई.सी., २० मि.ली. पिक परिस्थितीनुसार फवारणी करावी. पहिल्या फवारणीनंतर १५ दिसानंतर दुसरी फवारणी ईथिऑन ५० टक्के ईसी २५ मिली, किंवा इमामेक्टीन बेझोएट ५ टक्के एस जी ४ ग्रॅम, किंवा स्पिनेटोरम ११.७० टक्के एससी ९ मिली, किंवा क्लोरॅन्ट्रानिलीप्रोल १८.५ एससी ३ मिली, किंवा इंडोक्झाकार्ब १५.८० इसी ६.६ मिली, किंवा लँबडा सायहेलोथ्रीन ०.५ इसी १० मिली यापैकी कोणत्याही एका किटकनाशकाची प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. वरील किटकनाशकांची मात्रा ही साध्या पंपासाठी असुन, पावरस्प्रे साठी मात्रा तिप्पट करावी. हरभऱ्यांवरील पाटेअळीचे एकात्मिक व्यवस्थापनासाठी उपाययोजना करावे, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी केले आहे.

# महात्मा बसवेश्वर सामाजिक समता, क्रांतीवीर राजे उमाजी नाईक पुरस्कारासाठी प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन




जनसंचलन/बुलढाणा

वीरशैव लिंगायत समाजाचा सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक विकास होण्यासाठी कलात्मक, समाजप्रबोधन व साहित्यिक समाज प्रबोधनकार आणि समाज सेवकांना तसेच सदर समाजासाठी कार्य करणाऱ्या संस्थांना प्रतिवर्षी महात्मा बसवेश्वर सामाजिक समता पुरस्कार एक व्यक्ती व एक संस्था यांना देण्यात येतात. यासाठी प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सदर पुरस्कार हा विरशैव-लिंगायत समाजाकरीता सामाजिक शैक्षणिक सांस्कृतिक, समाज संघटनात्मक आध्यात्मिक प्रबोधन व आर्थिकदृष्टया कल्याणासाठी झटणारे नामवंत समाजसेवक, कलावंत समाज संघटनात्मक कार्यकर्ते, अध्यात्मिक प्रबोधनकार व साहित्यीक तसेच सामाजिक संस्था यांना सन २०२५-२६ या वर्षासाठी प्रदान करण्यात येणार आहे. या पुरस्कारासाठी पुरूष वयोमर्यादा किमान ५० वर्ष तर महिला किमान ४० वर्ष असून सामाजिक संस्थेसाठी सदर क्षेत्रातील किमान १० वर्ष कार्य केलेले असल्याचा निकष आहे. इच्छुक व्यक्ती आणि संस्था यांनी १५ दिवसाच्या आत आपला प्रस्ताव सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण कार्यालय, बुलढाणा, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, त्रिशरण चौक चिखली रोड बुलढाणा येथे सादर करावे, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहाय्यक संचालक मनोज मेरत यांनी केले आहे.

# अण्णासाहेब पाटील महामंडळ योजनांतील लाभार्थ्यांना १५ जानेवारीपर्यंत विशेष मुदत

जनसंचलन/ बुलढाणा

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या विविध योजनांतर्गत ज्या लाभार्थ्यांचे पात्रता प्रमाणपत्र () दि. १ जानेवारी २०२५ पूर्वी निर्माण झाले आहे किंवा ज्या लाभार्थ्यांना बँकेकडून कर्ज मंजुरी प्राप्त झाली आहे, अशा सर्व प्रकरणांसाठी दि. १५ जानेवारी २०२६ पर्यंत पोर्टलवर बँक मंजुरीपत्र अपलोड करण्याची विशेष मुभा देण्यात आली आहे. या विशेष सुविधेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांनी त्यांच्या लॉगिनमध्ये उपलब्ध करून देण्यात आलेल्या प्रश्नावलीस योग्य उत्तरे देणे आवश्यक आहे. प्रश्नावली पूर्ण केल्यानंतरच संबंधित लाभार्थ्यांना बँक मंजुरीपत्र अपलोड करण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे. सदर सुविधा तात्पुरत्या स्वरूपाची असून, लाभार्थ्यांनी दि. १५ जानेवारी २०२६ पूर्वीच बँक मंजुरीपत्र पोर्टलवर अपलोड करावे, असे आवाहन महामंडळामार्फत करण्यात आले आहे.




# सिकलसेल मुक्तीसाठी १५ जानेवारीपासून विशेष अभियान ७ फेब्रुवारीपर्यंत जिल्हाभरात तपासणी व जनजागृती




जनसंचलन/बुलढाणा


जिल्ह्यात सिकलसेल ॲनिमिया या आनुवंशिक आजाराचे समूळ उच्चाटन करण्यासाठी आरोग्य विभाग सज्ज झाला असून आरोग्य विभागाच्या निर्देशानुसार दि. १५ जानेवारी ते ७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत सिकलसेल ॲनिमिया विशेष अभियानफ राबविण्यात येणार आहे. या अभियानांतर्गत ४० वर्षांपर्यंतच्या सर्व नागरिकांची प्राथमिक सिकलसेल तपासणी करण्यात येणार आहे. तपासणीदरम्यान संशयित रुग्ण व वाहकांची नोंद घेऊन आवश्यकतेनुसार एचपीएलसी () किंवा इलेक्ट्रोफोरेसिस या प्रगत तपासण्या केल्या जाणार आहेत. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दत्तात्रय बिराजदार यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण जिल्हा आरोग्य यंत्रणा या विशेष अभियानासाठी सज्ज झाली आहे. जिल्हा व उपजिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे तसेच आयुष्यमान आरोग्य मंदिरांमध्ये आवश्यक मनुष्यबळ व तपासणी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. अशी राहील प्रक्रिया: अभियानादरम्यान ४० वर्षांपर्यंतच्या नागरिकांची प्राथमिक तपासणी करण्यात येईल. संशयित रुग्णांची पुढील सखोल तपासणी करून त्यांना औषधोपचार, समुपदेशन व आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन दिले जाणार आहे. भावी पिढीला या आजारापासून सुरक्षित ठेवण्यासाठी विवाहपूर्व व प्रसूतीपूर्व समुपदेशनावर विशेष भर देण्यात येणार आहे. अभियान यशस्वी करण्यासाठी शाळा व महाविद्यालयांमध्ये जनजागृती उपक्रम, प्रश्नमंजुषा, रांगोळी व निबंध स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे. तसेच बॅनर, पोस्टर्स, सोशल मीडिया, गृहभेटी यांद्वारे सिकलसेल ॲनिमियाबाबत व्यापक जनजागृती केली जाणार आहे. ग्रामीण भागात महिला मंडळांच्या माध्यमातूनही विशेष जनजागृती उपक्रम राबविले जाणार आहेत. सिकलसेल मुक्त बुलढाणा जिल्हा करण्यासाठी सर्व नागरिकांनी या मोहिमेत उत्स्फूर्त सहभाग घ्यावा. विशेषतः तरुणांनी तपासणी करून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते यांनी केले आहे.

# मनसेला बालेकिल्ल्यातच धक्क्यांवर धक्के, बाळा नांदगावकरांच्या कट्टर समर्थकाचा जय महाराष्ट्र...

वृत्तसंस्था/मुंबई

मुंबई महापालिका निवडणुकांच्या तोंडावर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला बालेकिल्ल्यातच धक्क्यांवर धक्के बसताना पाहायला मिळत आहेत. मनसेचे शिवडी विधानसभा अध्यक्ष आणि मनसे नेते बाळा नांदगावकर यांचे कट्टर समर्थक असलेले संतोष नलावडे यांनी पक्षाला जय महाराष्ट्र केला आहे. महाराष्ट्र सैनिकांना पत्र लिहित संतोष नलावडे यांनी मनातील खदखद व्यक्त केली. संतोष धुरी, वीरेंद्र तांडेल यांच्यामागोमाग नलावडेंनीही पक्षाची साथ सोडल्याचे दिसत आहे. माझ्या नेत्यांनी, ज्यांच्यासाठी आम्ही आयुष्य पणाला लावले, त्यांनीच या जागावाटपात पूर्णपणे हाराकिरी केली. आमच्या नेत्यांनीच आमचा राजकीय बळी दिला, असा गंभीर आरोप संतोष नलावडे यांनी केला आहे. शिवडी, माहिम, वरळी, कांजुरमार्ग, भांडुप... हा मराठी माणसाचा बालेकिल्ला आहे. इथे मनसेचा कडवट, निर्णायक मताधार आहे. मात्र इथेच आम्हाला जागा देण्यात आल्या नाहीत. नेत्यांनी महाराष्ट्र सैनिकांच्या हक्काचा बळी दिला, अशी खदखद नलावडेंनी व्यक्त केली. वटवृक्षाच्या सावलीत आम्ही विसावायचो, पण आज तोच वटवृक्ष पक्षातील काही नेते आपल्या स्वार्थासाठी छाटत आहेत. या वटवृक्षाला विषारी इंजेक्शन देऊन मारण्याचे काम पद्धतशीरपणे सुरू आहे. अशा विषारी झाडाला ना पाने येतात, ना फुले, ना फळे; तिथे पक्षीदेखील बसत नाहीत. जर आमचा आधारच छाटला जात असेल, तर आम्ही उभं राहायचं तरी कुठे? असा सवाल नलावडेंनी व्यक्त केला. आज हे पत्र लिहिताना मनात असंख्य वादळे घोंघावत आहेत. विचारांचे वादळ आले आहे. गेले अनेक दिवस मी अस्वस्थ आहे. ज्या भावनेने मी महाराष्ट्र नवनिर्माण पक्षाचा सदस्य झालो. पुढे झपाटून काम केले. त्याच पक्षाने माझ्यावर हे असं पत्र मला लिहायची वेळ आणली आहे. हे मलाच भयानक स्वप्नासारखे वाटते आहे. शाळेत असल्यापासून रक्तात सळसळणारा शिवसैनिक आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या स्थापनेपासून राजसाहेबांच्या विचारांशी एकनिष्ठ राहिलेला हा तुमचा भाऊ, आज आयुष्याच्या एका अत्यंत कठीण वळणावर उभा आहे. गेली २० वर्षे आपण संघटनेसाठी काय नाही केले? राजसाहेबांच्या एका शब्दावर आपण रस्त्यावर उतरलो. मराठी पाट्यांचे आंदोलन असो, टोलचा मुद्दा असो, रेल्वे भरती असो वा भोंग्यांविरोधातील एल्गार... आपण रक्ताचे पाणी केले, घाम गाळला. अंगावर केसेस घेतल्या, तडीपारी भोगली, तुरुंगवास सोसला. पक्षासाठी तन-मन-धन अर्पण केले.घरा-दारावर पाणी सोडले. हे सर्व कशासाठी? फक्त राजसाहेबांच्या एका स्वप्नासाठी की, महाराष्ट्रातील कोणत्याही आई-बापाला अभिमान वाटेल की माझा मुलगा मनसेमध्ये आहे.इ्र्ब्र् हे सन्माननिय राजसाहेबांचे वाक्य सत्यात उतरवण्यासाठीच. राजसाहेबांनी त्यांच्या विचारांनी जो पक्ष फुलवला, आपल्यासारख्या निष्ठावंतांनी रक्त सांडून त्याचा वटवृक्ष केला. त्या वटवृक्षाच्या सावलीत आम्ही विसावायचो, पण आज अत्यंत वेदनेने सांगावे लागते की, तोच वटवृक्ष पक्षातील काही नेते आपल्या स्वार्थासाठी छाटत आहेत. या वटवृक्षाला विषारी इंजेक्शन देऊन मारण्याचे काम पद्धतशीरपणे सुरू आहे. अशा विषारी झाडाला ना पाने येतात, ना फुले, ना फळे; तिथे पक्षीदेखील बसत नाहीत. जर आमचा आधारच छाटला जात असेल, तर आम्ही उभं राहायचं तरी कुठे? शिवसेना (उबाठा) आणि मनसेची युती झाली, दोन भाऊ एकत्र आले, बाळासाहेबांचे स्वप्न पूर्ण झाले, याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. आम्हीही त्याच विचारांचे पाईक आहोत. पण या युतीच्या जागावाटपात जे घडले, त्याला काय म्हणावे? माझ्या नेत्यांनी, ज्यांच्यासाठी





आम्ही आयुष्य पणाला लावले, त्यांनीच या जागावाटपात पूर्णपणे हाराकीरी केली! हो, मी जाणीवपूर्वक हा शब्द वापरतोय हाराकीरी. ही स्वतःच्या हाताने स्वतःच्या अस्तित्वावर केलेली जखम आहे. शिवडी, माहिम, वरळी, कांजुरमार्ग, भांडुप... हा मराठी माणसाचा बालेकिल्ला आहे. इथे मनसेचा कडवट, निर्णायक मताधार आहे. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत जे अपयश आले, त्याचे खापर सर्वस्वी आमच्या माथी मारून आज आमचा राजकीय बळी दिला जात आहे. हे अयोग्य आहे. हे पाप आहे! शिवडी विधानसभा मतदारसंघाला आम्ही आई-वडिलांप्रमाणे मानले. तिथल्या मतदारांना जपले. पण आज आमच्या नेत्यांनी जागावाटपात घेतलेला हा निर्णय केवळ आमचाच नाही, तर मनसेवर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येक शिवडीकराचा विश्वासघात आहे. फक्त मला एकट्यालाच उमेदवारी द्या असे माझे म्हणणे कधीच नव्हते. राग माझ्यावर असेल तर माझे दुसरे पदाधिकारी, महाराष्ट्र सैनिक एकापेक्षा एक होते. त्यांनाही जनाधार आहे. मग त्यांच्यावर का अन्याय केलात?

# भाजपची जळगावात सर्वात मोठी कारवाई, तब्बल २७ जणांची पक्षातून थेट हकालपट्टी



वृत्तसंस्था/ जळगाव

जळगाव महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात राजकीय घडामोडींना प्रचंड वेग आला आहे. भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या तीनही पक्षांची शहरात पक्की महायुती दिसत आहे. विशेष म्हणजे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्ह्यातील बडे नेते तथा राज्याचे माजी मंत्री गुलाबराव देवकर यांच्या चिरंजीवांच्या विरोधात बंडखोरी करणाऱ्या भाजपच्या पदाधिकाऱ्याच्या विरोधात भाजपने टोकाचं पाऊल उचललं आहे. फक्त एकाच नाही तर शहरातील तब्बल २७ पदाधिकाऱ्यांच्या विरोधात भाजपने कठोर कारवाई केली आहे. उमेदवारी मिळाली नाही म्हणून बंडखोरी करणाऱ्या भाजपच्या पदाधिकाऱ्यांची पक्षातून थेट हकालपट्टी करण्यात आली आहे. भाजपच्या या कारवाईची सध्या शहराच्या राजकारणात जोरदार चर्चा आहे. माजी मंत्री गुलाबराव देवकर यांना आव्हान देणाऱ्या भाजप बंडखोराची हकालपट्टी करण्यात आली आहे. पक्षशिस्त भंग केल्याचा ठपका ठेवत भारतीय जनता पक्षाने २७ पदाधिकाऱ्यांची पक्षातून हकालपट्टी केली आहे. महानगरपालिकेचे माजी स्थायी समिती सभापती असलेल्या जितेंद्र मराठे यांनी बंडखोरी केली आहे. त्यांनी माजी मंत्री गुलाबराव देवकर यांचे पुत्र प्रफुल्ल देवकर यांना आव्हान दिलं आहे. जितेंद्र मराठे यांच्यासह २७ पदाधिकाऱ्यांची पक्षातून हकालपट्टी करण्यात आली आहे. याशिवाय उमेदवारी नाकारल्याने हॉटेल बाहेर भाजप आमदार सुरेश भोळे यांना घेराव घालणाऱ्या संगीता पाटील यांचीदेखील पक्षातून हकालपट्टी करण्यात आली आहे. भारतीय जनता पक्षाने दोन दिवसांपूर्वी भाजपाचे बंडखोर उमेदवार तथा माजी स्थायी सभापती जितेंद्र मराठे यांना दोन दिवसांची मुदत दिली होती. त्यांनी खुलासा सादर करावा, असे आशयाचे प्रसिद्धी पत्र भाजपने काढले होते. त्यावर बंडखोर उमेदवार जितेंद्र मराठे यांनी कुठलाही खुलासा न सादर केल्याने आज थेट भारतीय जनता पक्षाने जितेंद्र मराठे यांच्यासह २७ जणांची पक्षातून हकालपट्टी केली आहे. जळगाव जिल्ह्यात ही सर्वात मोठी शिस्तभंगाची कारवाई पक्षाने केलेली आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८